न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कुदळवाडीतील अनधिकृत बांधकामांवर अखेर हातोडा

## पहाटे पासूनच मोठ्या पोलीस बंदोबस्तात कारवाई सुरु : इंटरनेट सेवा बंद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवडच्या कुदळवाडी येथे अखेर अनधिकृत बांधकामांवर हातोडा पडला आहे. महापालिकेने सहा दिवसांची मुदत देत अतिक्रमणे काढायला सांगितले होते. ती मुदत शुक्रवारी (दि.७) संपली होती. त्यामुळे शनिवारी (दि.८) पहाटेच महापालिकेने कारवाईस सुरवात केली आहे.

या कारवाईसाठी महापालिकेची पथकं पहाटेचं तैनात करण्यात आली. पोलिसांकडून कारवाईस्थळी जाणारे मार्ग बंद करण्यात आले आहेत. दिवस उजेडताच कारवाईचा बडगा उगरण्यात आला. परिसरातील नागरिकांना काही काळण्यापूर्वी हातोडा पडल्यानं गेल्या आठवड्याप्रमाणे तणाव टळला. भंगार दुकाने, गोदामे, कंपन्या, हॉटेल, वर्कशॉप्स,




बेकरी दुकानदार या व्यावसायिकांनी अनधिकृत बांधकामे आणि पत्राशेडवरील कारवाईला पहाटेपासूनच सुरवात केली आहे.

कुदळवाडी परिसरात मोठ्या संख्येने अनधिकृत भंगार दुकाने आणि गोदामांसह इतर व्यावसायिक आस्थापना आहेत. या भागात वारंवार आगीच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे येथील ५ हजार अनधिकृत आस्थापनांना महापालिकेच्या 'क' आणि 'फ' क्षेत्रीय कार्यालयाने नोटीसा बजावल्या आहेत. कारवाईला घेऊन स्थानिकांमध्ये नाराजीचा सुर मात्र कायम आहे. शनिवारी (दि.८) पहाटेच महापालिकेने कारवाईस सुरवात केली आहे. या परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# पवना नदीसुधार प्रकल्पास निधी मंजूर करा : आमदार गोरखे

## 'पवना नदी सुधार प्रकल्प' कार्यान्वित होणार : उपमुख्यमंत्री अजित पवार याचं आश्वासन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये दरवर्षी निर्माण होणारी पूरजन्य परिस्थिती लक्षात घेता पवनानदी सुधार प्रकल्पासाठी तत्काळ निधी मंजूर करण्यात यावा, अशी मागणी आमदार अमित गोरखे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.

जिल्हा वार्षिक योजना पुणे विभागाच्या पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत गोरखे यांनी ही मागणी केली. पिंपरी-चिंचवड शहराच्या मध्यभागातील पवनानदी सुधार प्रकल्पाचे काम सुरू होण्यासाठी निधीअभावी अद्याप मुहूर्त मिळालेला नाही. ही बाब



आमदार गोरखे यांनी उपमुख्यमंत्री पवार यांच्या निदर्शनास आणून दिली. गोरखे म्हणाले, की पावसाळ्यात पवनानदीलगतच्या परिसरात पूरजन्यस्थिती निर्माण होते. मामुर्डी, किवळे, रावेत, वाल्हेकरवाडी, चिंचवड, काळेवाडी, रहाटणी, पिंपरी, कासारवाडी, फुगेवाडी, पिंपळे गुरव, दापोडी, सांगवी या भागांमध्ये ही परिस्थिती पाहण्यास मिळते. पिंपरी, कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी येथील नागरिकांना पूरजन्यस्थिती निर्माण झाल्यानंतर तात्पुरते स्थलांतर करावे लागते. त्यामुळे विशेष बाब म्हणून पवना नदीसुधार योजनेसाठी केंद्रासह राज्य शासनाकडून विशेष निधी मिळावा.

यावेळी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार दिलीप वळसे-पाटील, आमदार शंकर जगताप, सुनील शेळके, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पलकुंडलवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आदी उपस्थित होते.

### उपमुख्यमंत्र्यांचा तात्काळ प्रतिसाद

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी याबाबत तत्काळ सकारात्मक प्रतिसाद दर्शविला. पवना नदीसुधार प्रकल्पाचा विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना त्यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना दिल्या आहेत. त्यांनीदेखील तत्काळ सकारात्मक सहमती दर्शविली आहे. तसेच, राज्य शासन आणि पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प सुरू होईल, असे नमूद केले आहे.

# रस्ते झाडण्यासाठी 200 कोटी खर्च!

## पुण्यातील खासगी रुग्णालयात मृत्यूची नोंद : राज्यातील रुग्णसंख्या 173 वर

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील चार झोनमधील १८ मीटरहून अधिक रुंदीचे ४० किलोमीटरचे रस्ते यांत्रिकी पद्धतीने स्वच्छ करण्यासाठी महापालिकेने २०० कोटी रुपये खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. रस्ते सफाईसाठी काढण्यात आलेल्या निविदा ५.७५ टक्के अधिक दराने आलेल्या असतानाही त्याला स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

विशेष म्हणजे एकाच ठेकेदाराला तीन निविदा मिळाल्याने यामध्ये 'आर्थिक हितसंबध' जोपासले गेल्याची जोरदार चर्चा महापालिकेत सुरू झाली आहे. पुणे महापालिकेच्या हद्दीतील १८ मीटरपेक्षा अधिक रुंदीचे रस्ते यांत्रिकी पद्धतीने स्वच्छ करण्यासाठी महापापालिकेच्या घनकचरा विभागाने निविदा काढल्या होत्या.



या निविदा १६० कोटी रुपयांच्या होत्या. जादा दराने १७२ कोटी रुपयांच्या निविदा महापालिकेकडे आल्या आहेत. पुढील सात वर्षांसाठी हे काम असून, प्रत्येक वर्षी सहा टक्के इतकी दरवाढ केली जाणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात सात वर्षांमध्ये हा खर्च साधारण २०० कोटी रुपयांपर्यंत जाणार आहे. चार झोनमधील ४० किलोमीटरचे रस्ते साफ केले जाणार आहेत. यासाठी तीन झोनमध्ये एकाच ठेकेदाराला हे काम मिळाले असून, एका झोनमध्ये दुसऱ्या ठेकेदाराला काम मिळाल्याने यामध्ये रिंग झाल्याचे बोलले जात आहे.

गेल्या वर्षी महापालिका प्रशासनाने याच कामासाठी काढलेल्या निविदा ३५ टक्के वाढीव दराने आल्या होत्या. त्यावरून सर्वच स्तरांतून महापालिकेच्या कारभारावर टीका झाल्याने ही निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली होती. त्यानंतर महापालिकेच्या घनकचरा विभागाने प्रचलित दराचा अभ्यास करून फेरनिविदा काढताना या कामाची अंदाज रक्कम प्रति किलोमीटरसाठी ३१३ रुपयांनी वाढविली.

स्थायी समितीमध्ये मान्य करण्यात आलेल्या चार झोनपैकी तीन झोनची कामे मुंबईतील मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. या कंपनीला मिळाली आहेत. या कंपनीकडे झोन २, ३ आणि ४ चे काम असणार आहे. झोन १ चे काम बी. व्ही. जी. इंडिया लि. कंपनीला मिळाले आहे.

### दहा किलोमीटर पदपथांची होणार स्वच्छता

» महापालिकेने मान्यता दिलेल्या कामांमध्ये चारही झोनमधील साधारण १० किलोमीटरच्या पदपथांचा समावेश आहे. या रस्त्यांची नियमित स्वच्छता होणार आहे. नवीन निविदेत पिंपरी चिंचवड, नवी मुंबई आणि बृहन्मुंबईमध्ये सुरू असलेल्या यांत्रिकी पद्धतीने झाडण कामाशी तौलनिक अभ्यास तसेच रोजंदारीच्या दरातील वाढ गृहीत धरून अंदाज केल्याने हा दर ३१३ प्रतिकिलोमीटर रुपयांनी वाढला आहे, असे घनकचरा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

### आधीचा ठेकेदार दिवाळखोरीत

» गेल्या काही वर्षांपासून पुणे शहरातील रस्त्यांची यांत्रिकी पद्धतीने स्वच्छता केली जाते. शहरातील पाचही झोनमधील रस्त्यांच्या सफाईच्या कामासाठी पूर्वी दोन निविदा काढल्या होत्या. त्यापैकी एका ठेकेदाराकडे एका झोनचे काम होते, तर उर्वरित चार झोनची कामे दुसऱ्या एका ठेकेदाराकडे होती. ज्या ठेकेदाराकडे चार झोनची कामे होती, तो दिवाळखोरीत निघाला. त्यामुळे त्याचे काम बंद झाले आहे. परिणामी, चार झोनमधील रस्त्यांचे झाडण काम महापालिकेचे कर्मचारी करीत आहेत.

# जिल्ह्याचा वार्षिक आराखडा 1791 कोटींचा

## राज्याच्या निधीतही 2 हजार कोटींची वाढ : उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा वार्षिक योजनांच्या माध्यमातून गतवर्षी राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये १८ हजार कोटी रुपयांचा निधी वितरित केला होता. यावर्षी हा निधी वाढवून २० हजार कोटी रुपये करण्यात येणार आहे. या वाढीव निधीच्या प्रमाणात प्रत्येक जिल्ह्याला निधी वाढवून देण्यात येईल. मात्र, दिलेला सर्व निधी ठरलेल्या मुदतीत आणि गुणवत्तापूर्ण कामांवर खर्च होईल, याची काटेकोर दक्षता सर्व यंत्रणांनी घ्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री आणि वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. यात पुणे जिल्ह्याच्या सर्वसाधारण योजनांसाठी १ हजार ७९१ कोटी रुपयांचा आराखडा सादर करण्यात आला आहे.

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण २०२५-२६ चा पुणे, सातारा, सोलापूर, सांगली, कोल्हापूर या पाच जिल्ह्यांचा प्रारूप आराखडा अंतिम करण्यासाठीची राज्यस्तरीय बैठक अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात शुक्रवारी पार पडली. यावेळी सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री तथा वन व पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाममंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे,



मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव पाटील, कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, सहपालकमंत्री माधुरी मिसाळ, खासदार विशाल पाटील, संबंधित जिल्ह्यांमधील आमदार व अधिकारी उपस्थित होते.

या वेळी पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जिल्ह्याच्या सर्वसाधारण योजनांसाठी १ हजार ७९१ कोटी रुपयांचा आराखडा सादर केला. यात १ हजार ९१ कोटी ४५ लाख रुपयांचा कमाल नियतव्यय आणि ७००कोटी रुपयांच्या अतिरिक्त मागणीचा समावेश आहे. आराखड्यांतर्गत प्रामुख्याने प्राथमिक, माध्यमिक शाळांकरिता पायाभूत सुविधा निर्माण करणे, अंगणवाड्यांचा विकास, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे, उपकेंद्रांचे बांधकाम व विस्तारीकरण, जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा, लघुपाटबंधारे योजना, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, ग्रामपंचायतींसाठी जनसुविधा, नागरी क्षेत्राच्या पायाभूत सुविधा, अपारंपरिक ऊर्जा, परिवहन, पाणंद रस्ते खुले करणे यांवर भर देण्यात आला आहे.

जिल्ह्यात ३०३ प्राथमिक शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी 'माझी शाळा - आदर्श शाळा', १०८ प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या विकासासाठी स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र हे उपक्रम चांगल्या पद्धतीने राबवावेत, असे निर्देश अजित पवार यांनी दिले. अंगणवाड्यांच्या बांधकामासाठी शासकीय निधीसोबतच सीएसआरमधूनही निधी उपलब्ध करून घ्यावा. केंद्र सरकारचा अधिकाधिक निधी आणण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# पालिका रुग्णालयात कागदी टोकनचा खेळ

## वैद्यकीय विभागप्रमुखांचे दुर्लक्ष, स्मार्ट कार्डची वानवा, कागदी प्रीस्क्रिप्शनवर चालवला जातो कारभार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची स्मार्ट सिटीकडे वाटचाल सुरू आहे. महानगरपालिकेकडून ईआरपी माध्यमातून सर्व कामकाज ई-ऑफिस सुरू होत असताना पालिकेच्या सर्व रुग्णालयात कागदी खेळ सुरू आहे. बाह्यरुग्ण विभागात आलेल्या रुग्णांना एका चिठ्ठीवर हे कार्ड प्रिंट करून दिले जात आहे. त्यामुळे स्मार्ट हेल्थ कार्ड रुग्णांना कधी मिळणार, असा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाअंतर्गत नागरिकांना वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी शहरात ३२ दवाखाने आहेत, तर आठ रुग्णालये आहेत. महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालय, नेत्र रुग्णालय, आकुर्डी, पिंपरी, थेरगाव आणि चिंचवड येथील रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची माहिती डिजिटल स्वरूपात जतन करण्यात यावी, यासाठी २०१० सालापासून ई-हेल्थ कार्ड प्रणाली सुरू करण्यात आली होती. या हेल्थ कार्डचे एका खासगी कंपनीकडे काम देण्यात आले होते.

मात्र, २०२० 'वायसीएम'मध्ये पीव्हीसी स्मार्ट कार्ड स्वरूपातील हेल्थ कार्ड देणे बंद करण्यात आले आहे. त्या ऐवजी एका चिठ्ठीवर हे कार्ड प्रिंट करून दिले जात आहे. त्यामुळे रुग्णांचा डिजिटल डाटा जतन होण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे यामुळे एका रुग्णाचे एकाहून अधिक एमआरडी नंबर तयार होत असल्याने रुग्णाची मेडिकल हिस्ट्री जाणून घेण्यात डॉक्टरांनादेखील अडचणी येत आहेत.

'वायसीएम' रुग्णालयासह अन्य रुग्णालयातदेखील या प्रणालीमुळे अचूक निदान, वैद्यकीय उपचार, रुग्णांचा वैद्यकीय इतिहास जतन करणे सोपे आहे. ही सेवा पूर्ण ऑनलाइन आहे.

कित्येक वर्षांनंतरही रुग्ण उपचारासाठी आल्यास केसपेपर काढताना पहिल्यांदा हेल्थ कार्ड विषयी विचारणा करण्यात येते. त्या माध्यमातून डॉक्टरांना रुग्णांची पूर्व माहिती मिळते. त्यानंतर पुढील उपचार दिले जातात. त्यामुळे रुग्णांना ढिगभर कागदपत्रे जवळ बाळगावी लागत नाहीत. वेळेची बचत होते.

आता सुरुवातीला नवीन कार्ड काढताना ३० रुपये आणि नंतरच्या उपचारासाठी दरवेळी दहा रुपये केस पेपरसाठी घेतले जात होते. मात्र, करोनामध्ये २०२० सालापासून हे हेल्थ कार्ड बंद करण्यात आले. त्यानंतर हेल्थ कार्ड देणेच बंद करण्यात आले. आता टोकनच्या चिठ्ठीवर हे कार्ड प्रिंट करून दिले जात आहे. त्यामुळे प्रत्येक टोकनसाठी २० रुपये खर्च करावे लागत आहेत.



### हेल्थकार्डचे प्रिंटर धूळखात

» अगोदर हेल्थ कार्डसाठी ३० रुपये घेतले जात होते. आता हेल्थ कार्ड देणे बंद असल्याने केस पेपरचे २० रुपये घेतले जात आहेत. त्यावेळी पीव्हीसी हेल्थ कार्डसाठी महापालिकेने खरेदी केलेल्या प्रिंटिंग मशिन धूळखात पडून आहेत. होलसेल बाजारात अशा एका पीव्हीसी स्मार्ट कार्डची किंमत पाच रुपयांपेक्षाही कमी असताना महापालिका कार्ड खरेदी करण्याची तसदी घेत नाही. महापालिकेच्या या उदासीनतेमुळे नागरिकांना दर्जेदार सुविधेपासून वंचित राहावे लागत आहे.

### चिठ्ठी गहाळ झाली, हिस्ट्री गायब...

» हेल्थ कार्डवर रुग्णाचा युनिक नंबर असतो. त्याला एमआरडी नंबर म्हणतात. उपचारासाठी रुग्ण आल्यानंतर पहिल्यांदा केस पेपर काढावा लागतो. त्यावेळीच रुग्णाला हेल्थ कार्ड चिठ्ठीवर प्रिंट करून दिले जाते. या रुग्णाला दरवेळी आल्यानंतर एमआरडी नंबर सांगितला, तरी ओपीडीचे टोकन मिळते. या एमआयडी नंबरमध्ये वैद्यकीय इतिहास जतन केला जातो. मात्र, ही चिठ्ठी गहाळ झाल्यास किंवा चिठ्ठीवरील शाही पुसल्यास रुग्णांना नवीन एमआरडी क्रमांक काढावा लागतो. त्यामुळे एक-एका रुग्णांचे २० एमआरडी नंबर तयार झाले आहेत. त्यामुळे त्या रुग्णांचा वैद्यकीय इतिहास जतन होण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत.

> महापालिकेच्या हेल्थ कार्ड देणा-या संबंधित ठेकेदार एजन्सीची २०१९ मध्ये मुदत संपली होती. त्यानंतर मुदतवाढ न देता सहा महिन्यात काम बंद करण्यात आले. त्यानंतर कागदी टोकन देण्यात येत आहे. महापालिकेची रुग्णालये व दवाखान्यांसाठी सेंट्रलाइज डिजिटल प्रणाली सुरू करणार आहे. त्यामुळे हेल्थ कार्ड बंद करून नवीन हेल्थ कार्ड मॅनेजमेंट सिस्टीम नवीन निविदा प्रक्रियेचे काम सुरू आहे.
>
> - डॉ. लक्ष्मण गोफणे, विभाग प्रमुख, वैद्यकीय विभाग, महापालिका

# अतिक्रमण विरोधी कारवाईचा मार्ग अखेर मोकळा

## चिखली, कुदळवाडी, जाधववाडीतील व्यावसायिकांची याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने चिखली, कुदळवाडी, जाधववाडी परिसरातील अनधिकृत बांधकाम व पत्राशेडवर कारवाई केली जात आहे. त्या कारवाईच्या विरोधात स्थानिक व्यावसायिकांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदरील याचिका न्यायालयाने सोमवारी (दि. ६) फेटाळली आहे. त्यामुळे महापालिकेकडून अतिक्रमण कारवाई होणार हे स्पष्ट झाले आहे.

चिखली, कुदळवाडी, जाधववाडी या परिसरातील भंगार दुकाने व गोदामांमुळे मोठ्या प्रमाणात वायू, ध्वनी व जलप्रदूषण होत आहे. तसेच, वारंवार होणाऱ्या आगीच्या घटनेमुळे जीवितहानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे महापालिकेने येथील तब्बल ५ हजार भंगार दुकाने व गोदामे तसेच, वेगवेगळ्या आस्थापनांना महापालिकेच्या क आणि फ क्षेत्रीय कार्यालयाने नोटीस बजावली होती. पंधरा दिवसांच्या मुदतीमध्ये अनधिकृत बांधकाम व पत्राशेड काढून घेण्याचे नोटिसीमध्ये बजावण्यात आले आहे.

ती मुदत संपल्यानंतर महापालिकेचे अतिक्रमण विरोधी पथक पोलीस बंदोबस्तात गुरुवारी (दि. ३०) कुदळवाडी पोहोचले होते. मात्र, व्यावसायिकांनी रस्त्यावर उतरून रास्ता रोको आंदोलन करीत कारवाईस विरोध केला. त्यामुळे पथक कारवाई न करता माघारी फिरले होते. दुसऱ्या दिवशी (दि. ३१) व्यावसायिकांच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीत बांधकामे व पत्राशेड काढून घेण्यासाठी ७ दिवसांची मुदत देण्यात आली. शुक्रवारी (दि. ७) पासून सरसकट कारवाई केली जाणार आहे. ही कारवाई करण्यात येऊ नये म्हणून इकबाल ख्वाजा संगम व इतरांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने ती याचिका तातडीने स्वीकारून त्यावर सोमवारी (दि. ६) सुनावणी घेतली. त्यात न्यायालयाने ती याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे महापालिकेकडून भंगार दुकाने व गोदामांवर कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे.



### उच्च न्यायालयात तब्बल 100 याचिका

» चिखलीतील कुदळवाडी व जाधववाडी परिसरातील अनधिकृत भंगार व इतर आस्थापनांच्या बांधकामे व पत्राशेडवरील कारवाईच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात दररोज याचिका दाखल करण्यात येत आहेत. आतापर्यंत १०० याचिका विविध व्यावसायिक तसेच, रहिवासी व जागामालक यांनी दाखल केल्या आहेत. त्यावर १४ फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

> महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी कारवाईच्या विरोधात काही व्यावसायिकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावर सोमवारी (दि. ६) सुनावणी झाली. त्यात ती याचिका फेटाळून लावण्यात आली आहे. त्यामुळे महापालिकेस अनधिकृत बांधकाम व पत्राशेडवर विनाअडथळा कारवाई करता येणार आहे.
>
> - चंद्रकांत इंदलकर, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त तथा कायदा सल्लागार

# सेमी हायस्पीड रेल्वे मूळ अरेखनानुसार व्हावा

## खासदार डॉ. कोल्हे : रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडून जीएमआरटी आणि रेल्वेच्या तंत्रज्ञांची संयुक्त बैठकीचे आश्वासन

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे मूळ आरेखनानुसार होण्यासाठी जीएमआरटी आणि रेल्वेच्या तंत्रज्ञांची संयुक्त बैठक आयोजित करण्याची मागणी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे. या संदर्भात रेल्वे प्रकल्प मध्य रेल्वे करणार असून संयुक्त बैठकीचे आयोजन करण्याचे वैष्णव यांनी मान्य केले आहे.

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून खासदार डॉ. कोल्हे यांनी गुरुवारी(दि.6) रेल्वेमंत्री वैष्णव यांची भेट घेऊन रेल्वेचा मूळ मार्ग बदलू नये अशी मागणी केली. त्याचबरोबर महारेल, रेल्वे आणि जीएमआरटी तंत्रज्ञांची संयुक्त बैठक आयोजित करुन तोडगा काढण्याची मागणी केली. यावेळी वैष्णव यांनी हा प्रकल्प मध्य रेल्वे करणार असल्याचे स्पष्ट करतानाच प्रकल्पात कोणतीही राजकीय अडचण येणार नाही असे आश्वासन दिले. तसेच मध्य रेल्वे आणि जीएमआरटीच्या तंत्रज्ञांची संयुक्त बैठक आयोजित करण्याचे मान्य केले.

रेल्वेमंत्री वैष्णव यांनी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कार्पोरेशनने तयार केलेला प्रकल्पाचा डीपीआर रद्द करुन नव्याने आखणी करण्याचे निर्देश रेल्वे प्रशासनाला दिले होते. वैष्णव यांनी सेमी हायस्पीड रेल्वेच्या मार्गात बदल करुन अहिल्यानगर, शिर्डी मार्गे नाशिक असा नवीन मार्ग प्रस्तावित करण्यात येत असल्याचे रेल्वे प्रशासनाने जाहीर केले होते. मात्र, प्रस्तावित नवीन रेल्वे मार्गाला खासदार डॉ. कोल्हे यांनी विरोध करुन जीएमआरटीच्या तंत्रज्ञांनी तोडगा काढावा अन्यथा जीएमआरटी प्रकल्प स्थलांतरित करण्याची मागणी केली होती.

या प्रकल्पासाठी नाशिकच्या देवस्थानाची जागा मिळत नव्हती नंतर जीएमआरटी या महाकाय दुर्बिणीच्या प्रकल्पाने जागा देण्यास विरोध केल्याने हा प्रकल्प सुरु होण्यापूर्वीच बारगळा आहे. पुणे ते अहिल्या नगर, शिर्डी मार्गे नाशिक या रेल्वे मार्गास खेड, आंबेगाव, जुन्नरसह नगर जिल्ह्यातील संगमनेरसह अनेक गावांतील शेतकरी आणि लोकप्रतिनिधींचा विरोध आहे. मूळ मार्ग बदलल्यास आंदोलन करण्याची भूमिका शेतक्यांनी घेतली आहे. मूळ रेल्वेमार्ग हा या भागातील जनतेची भाग्यरेषा बदलणारा असून आजवर विकासापासून वंचित राहिलेल्या या भागाचा विकास या रेल्वेमार्गामुळे होणार आहे, ही भूमिका खासदार डॉ. कोल्हे यांनी मांडली आहे.



### जीएमआरटी प्रकल्पच स्थलांतरित करण्याची मागणी

» खोडदच्या जीएमआरटी प्रकल्पाने महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या डीपीआरला आक्षेप घेतल्याने रेल्वेमंत्री वैष्णव यांनी या प्रकल्पाचा डीपीआर रद्द करुन नव्याने आखणी करण्याचे निर्देश रेल्वे प्रशासनास दिले होते. त्यानुसार या सेमी हायस्पीड रेल्वेच्या मार्गात बदल करुन अहिल्या नगर, शिर्डी मार्गे नाशिक असा नवा मार्ग प्रस्तावित करण्यात येत असल्याचे रेल्वे प्रशासनाने जाहीर केले होते. मात्र या नवीन मार्गाला खासदार डॉ. कोल्हे यांनी विरोध दर्शवत जीएमआरटीच्या तंत्रज्ञांनी तोडगा काढावा अन्यथा जीएमआरटी प्रकल्पच स्थलांतरित करण्याची मागणी केली होती.

### आंदोलनची घेतली भूमिका

» पुणे ते अहिल्यानगर, शिर्डी मार्गे नाशिक रेल्वे मार्गास खेड, आंबेगाव, जुन्नर, अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेरसह अनेक गावांतील शेतकरी व लोकप्रतिनिधींचा विरोध असून मूळ मार्ग बदलल्यास आंदोलन करण्याची भूमिका घेतली आहे. मूळ रेल्वेमार्ग हा या भागातील जनतेची भाग्यरेषा बदलणारा असून आजवर विकासापासून वंचित राहिलेल्या भागाचा विकास पुणे नाशिक रेल्वेमार्गामुळे होणार असल्याची भूमिका खासदार डॉ. कोल्हे यांनी सातत्याने मांडली आहे.

### मध्य रेल्वे राबविणार प्रकल्प

» संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू असून खासदार डॉ. कोल्हे यांनी आज रेल्वेमंत्री वैष्णव यांची भेट घेऊन पुणे – नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचा मूळ मार्ग बदलू नये अशी मागणी केली आहे. त्याचबरोबर महारेल, रेल्वे आणि जीएमआरटी तंत्रज्ञांची संयुक्त बैठक आयोजित करुन तोडगा काढण्याची मागणी केली. यावेळी वैष्णव यांनी हा प्रकल्प मध्य रेल्वेच करणार असल्याचे स्पष्ट करतानाच प्रकल्पात कोणतीही राजकीय अडचण येणार नाही असे आश्वासन दिले. तसेच मध्य रेल्वे आणि जीएमआरटीच्या तंत्रज्ञांची संयुक्त बैठक आयोजित करण्याचे मान्य केले.

# गहू पिकाला बसतोय उन्हाचा चटका; दाणे परिपक्व होण्याच्या वेळीस बसला फटका

## मागील 15 दिवसांपासून वातावरण बदल होऊन उन्हाचा चटका दिवसेंदिवस वाढत असल्याने याचा फटका रब्बी हंगामातील बहुतांश पिकांना बसत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील वाल्ह्यासह परिसरात मागील 15 दिवसांपासून वातावरण बदल होऊन उन्हाचा चटका दिवसेंदिवस वाढत असल्याने याचा फटका रब्बी हंगामातील बहुतांश पिकांना बसत आहे. उशीरा पेरणी केलेले गहू, हरभरा, ज्वारी, मका या पिकांमधील दाणे परिपक्व होण्यासाठी थंडीची आवश्यकता असताना उन्हाचा चटका वाढत असल्याने या पिकांच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता असल्याने शेतकरी वर्ग चिंतेत होत आहे.

यावर्षीही वाल्हे व परिसरात मान्सूनपूर्व व मान्सून पाऊस अल्प प्रमाणात पडला होता. मात्र, पिंगोरी, कवडेवाडी खो-यांमध्ये तसेच दौंडज खिंड तसेच सह्याद्रीच्या पर्वत रागांच्या परिसरात संततधार पाऊस पडल्याने वाल्हे गावातून वाहणा-या दोन्ही ओढ्यातून यावर्षी पाणी वाहिले होते. यामुळेच ओढा व परिसरातील विहिरी, बोअरवेल यांच्या पाणीपातळीत समाधानकारक वाढ झाली होती. यामुळेच मागील वर्षापेक्षा यावर्षी वाल्हे व परिसरात गहू पिकांचा पेरा, पोषक वातावरण असल्याने व उपलब्ध पाणीसाठ्यावर यंदा रब्बी पिकांची पेरणी वाढली.

मागील काही महिन्यात बदलत्या हवामानाचा मोठा फटका रब्बी हंगामातील पिकांना बसला होता.अचानक वाढत असलेले ऊन यामुळे गहू उत्पादक शेतकर्‍यांचे नुकसान होण्याची भीती शेतकर्‍यांकडून व्यक्त होत आहे. तसेच पिकांनाही या बदलत्या वातावरणाचा फटका बसण्याची शक्यता आहे. मागील दोन महिन्यांत पिकांना पोषक अशी थंडी पडत होती. या थंडीने पीके जोमात आली असून अचानक उन्हाचा चटका वाढल्याने गव्हाच्या पिकांला या वाढत्या तापमानाचा फटका बसण्याची शक्यता आहे.



### मागील वर्षीदेखील उष्णतेच्या लाटेमुळे फटका

» मागील वर्षीदेखील उष्णतेच्या लाटेमुळे गव्हाच्या उत्पादनात मोठी घट झाली होती. यावर्षीही आता वाल्हे परिसरात तापमानात मागील 15 दिवसांपासून उन्हाचा चटका वाढत चालला आहे. यामुळे गहू उत्पादक शेतकर्‍यांची चिंता वाढली आहे.

### थोडी खुशी – थोडा गम

» मागील काही दिवसांपासून,अचानक वाढती उष्णतेचा सामना येथील शेतकरीवर्गाला करावा लागत असून या अचानक वाढत्या उष्णचे चांगला तसेच परिणामकारक असे दोन्ही प्रकारचे फायदे शेतकरीवर्गाला होणार असल्याने, थोडी खुशी – थोडा गम' असी चर्चा शेतकरीवर्गामधून आहे.